प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (सन २०१८-१९)
संकलित मूल्यमापन - प्रथम सत्र परीक्षा (लेखी)
इयत्ता - सातवी, विषय - मराठी (प्रथम भाषा)
गुण - ५०

विद्यार्थ्याचे नाव - हजेरी क्र. ☐
शाळेचे नाव -
इयत्ता - तुकडी - दिनांक -
केंद्र - तालुका - जिल्हा -

प्र-१ शब्द ऐकून लिही ⑤

१) ६)
२) ७)
३) ८)
४) ९)
५) १०)

प्र.२ हा उतारा मनात वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

एका गावात सदा व सखू नावाचे जोडपे राहत होते. त्यांना गजानन नावाचा मुलगा होता. त्यांचा गाडगी, मडकी करण्याचा धंदा होता. भाजलेली मडकी सदा पंचक्रोशीतील गावांतल्या बाजारात विकायला नेई. गाढवाच्या पाठीवर मडकी ठेवून ते हाकत हाकत तो बाजाराला जायचा आणि येताना त्याच्या पाठीवर बसून यायचा. कधी कधी एखाद्या बाजारात मडकी शिल्लक राहत असत. ती तो कुण्या ओळखीच्या घरी ठेवायचा.

गजानन सदाबरोबर बाजारात जाण्यासाठी सतत पाठीमागे लागायचा. एके दिवशी सदा त्याला घाबरवण्यासाठी गचकअंधारी नावाच्या एका काल्पनिक जनावराची भीती त्याला दाखवतो.

प्र१) सदा व सखू यांच्या मुलाचे नाव काय होते? ①
योग्य पर्यायाला गोल करा.
अ) सदानन ब) गजानन क) नित्यानंद ड) सदानंद

प्र.२ सदाचा कोणता व्यवसाय होता? ②

प्र३ सदाने गजाननला कशाची भीती दाखवली? ②

Scanned by CamScanner

प्र.3 खाली दिलेली कविता मनात वाच आणि त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

गोमू माहेरला जाते हो नाखवा।
तिच्या घोवाला कोकण दाखवा॥
दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा॥१॥
कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा॥२॥
सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा॥३॥

प्रश्न एका शब्दात उत्तरे लिही. (1)
1) गोमूचे माहेर →

प्रश्न २) योग्य पर्यायाला गोल कर (2)
कोकणच्या खाडीच्या पाण्याचा रंग कसा आहे?
अ) निळा ब) पांढरा क) पिवळसर ड) पांढराशुभ्र

प्रश्न ३) कोकणची माणसे स्वभावाने कशी आहेत? (2)

प्र-४ खालील संवाद वाचून प्रश्नांची उत्तरे लिही.

फुलपाखरू - पतंगदादा, कुठं लागलं नाही ना तुला? फाटलाबिटला नाहीस ना?

पतंगदादा - नशिबाने वाचलो बाबा, आमच्या मालकाने दोऱ्याला एकदम झटका दिला धाडकन् आदळलोच मी तर जमिनीवर.

फुलपाखरू - बरं झालं दादा, मी तुझ्याबरोबर आकाशात भराऱ्या मारायला नाही आले ते माझ्या पंखांचा पार निकाल लागला असता.

प्रश्न-1) वरील संवाद कोणाकोणामध्ये झाला? (1)

२) पतंग जमिनीवर धाडकन का आदळला? (2)

३) फुलपाखरू पतंगाबरोबर उंच गेले असते, तर काय झाले असते, असे तुम्हाला वाटते? (2)

Scanned by CamScanner

प्र-५ खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.

अ) खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यय व त्यासंबंधित शब्द लिही. (2)

मी रोज सकाळी सहापूर्वी उठतो.

१) शब्दयोगी अव्यय-

२) संबंधित शब्द -

ब) क्रियाविशेषण अव्यय ओळखून लिही. (1)

पूर्वी राजेशाही होती.

क्रियाविशेषण अव्यय-

क) खालील विशेषणांच्या वाक्यात उपयोग कर. (2)

१) भव्य-

२) अप्रतिम -

ड) पुढील वाक्यातील सामान्यनाम व विशेषनाम ओळखून लिही. (2)

ताजमहाल उंच पर्वत आहे.

सामान्यनाम -

विशेषनाम -

इ) पुढील शब्द लेखननियमानुसार लिही. (1)

१) वीद्यादेवि -

ई) 'पणा' हा प्रत्यय असलेला एक शब्द लिही. (1)

पणा -

उ) योग्य शब्दसमूह निवडून वाक्य पुन्हा लिही. (1)

(चेहरा खुलणे, हायसे वाटणे, नजर खिळणे)

१) वाढदिवसानिमित्त बाबांनी नवीन कपडे आणल्यामुळे माझ्या मुखावर आनंद झाला.

Scanned by CamScanner

प्र ६. चित्रवर्णन (5)

चित्र पाहून संबंधित पाच वाक्ये लिही.



Scanned by CamScanner

प्र-६) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर तुझे मत व्यक्त कर.

१) मी प्लास्टिक / थर्माकोल वापरणार नाही. (5)

२) स्वच्छ मुंबईबद्दल माझे स्वप्न.

३) पृथ्वीवरील झाडे नष्ट झाली तर....

Scanned by CamScanner

प्र-८ खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे संवाद तयार करून लिही.
[सुधीरला पोहणे शिकायचे आहे.]
सुधीर आणि प्रशिक्षक यांमध्ये काय संवाद झाला तो लिही.

प्र-९ पुढील विषयावर पत्रलेखन कर.
तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करू या' हे दहा दिवसांचे शिबिर आयोजित केलेले आहे त्यात तुम्हाला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिही.

Scanned by CamScanner